# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 26.01.2026** **वार-सोमवार**

---

**कर्तव्यपथ-महाराष्ट्रपरिचयकेंद्रदिल्ली**

देशाचा ७७वा प्रजासत्ताक दिन आज राजधानी दिल्लीतल्या कर्तव्यपथावर अत्यंत उत्साहात आणि दिमाखात साजरा करण्यात आला. भारतीय लष्करी सामर्थ्य, विविधतेतून एकता दर्शवणारे चित्ररथ आणि अंतराळ क्षेत्रातील भारताची ऐतिहासिक भरारी हे यंदाच्या सोहळ्याचं मुख्य आकर्षण ठरलं. सोहळ्याच्या सुरुवातीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'राष्ट्रीय युद्ध स्मारक' इथं शूरवीरांना आदरांजली वाहिली. त्यानंतर मुख्य संचलनाला सुरुवात होण्यापूर्वी राष्ट्रपतींच्या हस्ते ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांना 'अशोक चक्र' प्रदान करून सन्मानित करण्यात आलं. यानंतर झालेल्या पथसंचलनात महाराष्ट्राच्या 'गणेशोत्सव: आत्मनिर्भरतेचे प्रतीक' या विषयावरील चित्ररथानं लक्ष वेधून घेतलं. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवातून ज्या सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली, तीच चळवळ आज आधुनिक भारताला कशी 'आत्मनिर्भर' बनवत आहे, याचं प्रभावी चित्रण या चित्ररथात करण्यात आले होते. गणेशोत्सवाच्या माध्यमातून मूर्तिकार आणि सजावट कलाकारांना मिळणारा शाश्वत रोजगार आणि त्यातून विणली गेलेली आर्थिक साखळी हे या सादरीकरणाच्या केंद्रस्थानी होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही वर्षा निवासस्थानी ध्वज फडकवून राष्ट्रध्वजास वंदन केलं आणि राज्यातल्या जनतेला प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पोलीसदलाच्या वतीनं राष्ट्रगीत आणि राज्यगीत सादर करून राष्ट्रध्वजाला सलामी देण्यात आली.

उपमुख्यमंत्री आणि ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाण्यातल्या पोलीस क्रीडा संकुलात तर पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार आज पुण्यातल्या पोलीस संचलन मैदानावर आयोजित सोहोळयात ध्वजवंदन केलं.

समता,स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांवर आधारित लोकशाही व्यवस्था टिकवणं ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे असं प्रतिपादन अजित पवार यांनी यावेळी केलं. केंद्र सरकारच्यावतीनं जाहीर करण्यात आलेल्या शौर्य आणि सेवा पदक तसंच पद्म पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातल्या मान्यवरांचा समावेश हा राज्यासाठी अभिमानाचा क्षण असल्याचं अजित पवार यांनी सांगितलं. पुणे महानगरपालिकेच्या स्वच्छ पुणे संकल्प या उपक्रमाच्या प्रचार-प्रसिद्धी रथालाही उपमुख्यमंत्री पवार यांनी हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पिंपरी इथल्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या हस्ते करण्यात आलं. त्यानंतर पालिकेच्यावतीनं निगडी इथल्या भक्ती शक्ती चौकात देशभक्तिपर गीतांचा कार्यक्रम सादर झाला; त्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**<u>विद्यापीठ</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातही आज प्रजासत्ताक दिन उत्साहात पार पडला. कुलगुरू प्राध्यापक डॉकटर सुरेश गोसावी यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आलं. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळं

संशोधनाभिमुख, बहुविषयक शिक्षण आणि कौशल्य विकासाला चालना मिळत असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं. यावेळी कुलगुरूंनी विद्यापीठाच्या वर्धापन दिनी देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची घोषणा केली.

**यशस्वी**

आपला देश आज विविध क्षेत्रात वेगानं प्रगती करीत असताना युवा पिढीनं सुद्धा आत्मनिर्भरतेचा मार्ग स्वीकारून कार्यशील होण्याचा प्रयत्न करायला हवा,असं मत कीट्रॉनिक्स इंडिया लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक राजेश कुलकर्णी यांनी व्यक्त केलं. ते आज चिंचवड इथं यशस्वी संस्थेच्या 'यशोगाथा' विशेषाकांचं प्रकाशन करताना बोलत होते. यावेळी कीट्रॉनिक्स इंडिया लिमिटेडच्या संचालिका मृणाल कुलकर्णी, यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या आयआयएमएस चे संचालक डॉक्टर शिवाजी मुंढे उपस्थित होते.

**पुणेमनपा**

पुणे महानगरपालिकेमार्फत मुळा-मुठा नदीकाठ सुधारणा प्रकल्प राबविण्यात येत आहे. पुणे शहरातून ४४ किलोमीटर लांबीनं वाहणाऱ्या या नदीपैकी पहिल्या टप्प्यात संगमवाडी ते बंडगार्डन दरम्यानचा ३ पूर्णांक ७ किलोमीटर लांबीचं काम हाती घेण्यात आलं असून सुमारे ९० टक्के काम पूर्ण झालं आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी आज या कामाची पाहणी केली आणि त्या ठिकाणी वृक्षारोपण केलं. ही मार्गिका येत्या १५ फेब्रुवारीला, महापालिकेच्या वर्धापन दिनी नागरिकांसाठी खुली करण्यात येणार आहे.

**पिंचिंमनपा**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडणुकीसाठी येत्या ६ फेब्रुवारीला सकाळी ११ वाजता विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. या सभेत स्थायी

समितीसह विविध ५ विशेष समित्यांच्या सदस्यांची देखील नियुक्ती केली जाणार आहे, अशी माहिती आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिली. महापौर आणि उपमहापौर पदासाठी अर्ज दाखल करण्याकरता २ फेब्रुवारीला दुपारी ३ ते ५ ही वेळ निश्चित करण्यात आली आहे, असं  नगरसचिव मुकेश कोळप यांनी सांगितलं.

**<u>आरोग्यसुविधाधोरण</u>**

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागानं आरोग्यसुविधा बळकट करण्यासाठी सामाजिक उत्तरदायित्व निधी वापरण्याचं नवं धोरण जाहीर केलं आहे. या धोरणानुसार कंपन्यांनी सीएसआर निधी प्रामुख्याने वस्तुरूपात देणं  अपेक्षित आहे. शासन आणि उद्योग क्षेत्र यांच्यात समन्वय वाढवून सार्वजनिक आरोग्यसेवा अधिक सक्षम करणे, हा या धोरणाचा उद्देश असल्याचं आरोग्य विभागानं  सांगितलं आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज किमान तापमान 13  पूर्णांक 9  दशांश अंश; तर कमाल तापमान २९ अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्या आकाश अंशत: ढगाळ राहण्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर,**

**संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**